देशोन्नती

# सफाई कामगारांच्या पाल्यांना निवासी शाळेत प्रवेश

देशोन्नती वृत्तसंकलन

**नागपूर :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाव्दारे सफाई कामगारांच्या मुला-मुलींची शासकीय निवासी शाळा, वाठोडा येथे कार्यान्वित असून या निवासी शाळेत सफाई कामागारांच्या पाल्यांना इयत्ता १ ली ते १० वी (इंग्रजी माध्यम) करिता प्रवेश दिला जातो.

सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात सदर निवासी शाळेत सफाई कामगारांच्या पाल्यांना मोफत प्रवेश देणे सुरू आहे. यासाठी पालकांकडे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले सफाईगार प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यान्वित जिल्ह्यातील, सफाई कामगारांच्या मुला-मुलींची शासकीय निवासी शाळा, वाठोडा, नागपूर येथील शासकीय निवासी

## शासनाचा उपक्रम



शाळेत अध्यापनासाठी प्रशिक्षित व अनुभवी शिक्षकवर्ग, मोफत शिक्षण साहित्य, शालेय गणवेश, क्रीडा ट्रॅक सुट, सर्व शैक्षणिक साहित्य, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य, पौष्टीक जेवण, नाश्ता, दूध, अंडी, फळे, अंथरूण, पांघरून, आंघोळीकरिता गरम पाण्याची व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. सुरक्षा, डिजिटल क्लास रूम, ग्रंथालय, खेळासाठी क्रीडा साहित्य, सुसज्ज संगणक कक्ष, विविध वाद्य साहित्याने समृध्द संगीत कक्ष, ई-लायब्ररी व इंटरनेट वाय-फाय आदी सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येतात.

Nagpur Edition Edition
Jul 05, 2024 Page No. 8
Powered by: erelego.com